नगरसचिव

<u>पुणे महानगरपालिकेच्या कामाकरिता</u>

**पुणे महानगरपालिका – सूचना – कार्यपत्रिका क्र. १४**

**फेब्रुवारी २०१९**

**<u>पुणे महानगरपालिकेची मासिक सर्वसाधारण सभा बुधवार दिनांक २० फेब्रुवारी २०१९ रोजी दुपारी ३:०० (तीन) वाजता हिंदवी स्वराज्याचे संस्थापक श्री छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात (पुणे महानगरपालिकेच्या नविन विस्तारीत इमारतीतील सभागृहात) भरेल.</u>**

सदर सभेत खालील विषयांचा विचार होईल.

**वृत्तांत कायम करणे.**

**'' नियुक्त्या ''**

<u>विषय क्र. ११२८</u>

'' महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २० (३) अन्वये १ मार्च २०१९ रोजी दुसऱ्या प्रहरी कार्यनिवृत्त होणाऱ्या स्थायी समितीच्या ८ (आठ) मा. सभासदांच्या जागी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २० (५) अन्वये व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३१(अ) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे महानगरपालिकेतील पक्षांच्या किंवा गटांच्या संख्या बळाच्या प्रमाणात प्रतिनिधित्व देऊन नविन ८ (आठ) मा. सभासदांच्या नियुक्त्या करणे.''

**प्रश्नोत्तरे**

महाराष्ट्र म.न.पा अधिनियम, १९४९ चे कलम ४४ अन्वये प्रश्नोत्तरे.

**– स्थायी समितीचे ठराव –**

<u>विषय क्र.११२९</u>

संदर्भ – १) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/भवन/६४९ दि.३०/१०/२०१८ चे पत्र.

२) मा.स्थायी समिती ठराव क्र.२२६२, दि.२२/१/२०१९

––––

मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून तसेच स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

मनपा भवन येथे विस्तारीत इमारत बांधणे व पुणे मनपा मिळकतीमध्ये क्षेत्रिय कार्यालय/प्रशासकीय इमारतीचे विस्तारीकरण करणेकरीता खालीलप्रमाणे वर्गीकरणाने तरतूद र.रू. ९५० लाख उपलब्ध करून देणेस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१८–२०१९ चे अंदाजपत्रक,<br>समाज विकास विभाग,<br>१) पुणे शहरातील रस्त्यावरील मुलांकरीता विविध उपक्रम राबविणे, (FE14C208) पान क्र. १४०. | ७५० लाख | –––– |
| २) आरोग्य विभाग, कैलास स्मशानभुमी येथील बायोमेडिकल वेस्ट प्लँट समोरील ट्रान्सफॉर्मर स्थलांतर करणे व इतर सुधारणा कामे करणे व विद्युत दाहिनी बसविणे (RE17F236), पान क्र. ६०. | २०० लाख | –––– |
| नविन सुचविलेले काम<br>भवन रचना विभाग, मनपा भवन येथे विस्तारीत इमारत बांधणे व पुणे मनपा मिळकतीमध्ये क्षेत्रिय कार्यालय/प्रशासकीय इमारतीचे विस्तारीकरण करणे | –––– | ९५० लाख |

<u>विषय क्र. ११३०</u>

संदर्भ – १) मा.सौ.परवीन शेख यांचे दि.१९/१/२०१९ चे पत्र

२) मा.स्थायी समिती ठराव क्र.२३२३, दि.२२/१/२०१९

––––

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

प्रभाग क्र.२७ ब, मध्ये कोंढवा खुर्द मिठानगर मधील ॲमिनिटी जागेवर आरक्षित असलेल्या (सिटी लॅब्रेरी) बांधणेसाठी र.रु.१० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
| --- | --- | --- |
| सन २०१८-१९ चे अंदाजपत्रक, १०.ग.विद्युत विभाग, पान क्र. १०६, अ.क्र. ४, शहरातील विविध ठिकाणी प्रकाश व्यवस्था करणे, (यादी क्र. एसबी५), पान क्र.२२३, अ.क्र.२७५, प्रभाग क्र.२७ ब ,मध्ये विविध ठिकाणी नविन पोल व फिटींग बसवून प्रकाश व्यवस्था करणे | १० लाख | --- |
| नविन सुचविलेले काम- प्रभाग क्र.२७ ब, मध्ये कोंढवा खुर्द मिठानगर मधील ॲमिनिटी जागेवर आरक्षित असलेल्या (सिटी लॅब्ररी) बांधणे | --- | १० लाख |

**विषय क्र. ११३१**

संदर्भ – १) मा.प्रवीण चोरबेले यांचे दि.२१/१/२०१९ चे पत्र

२) मा.स्थायी समिती ठराव क्र.२३२४, दि.२२/१/२०१९

----

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

प्रभाग क्र.२८ड येथील कलाभूमीचे शेजारील जागेमध्ये ज्येष्ठ नागरिकांसाठी व जिम करीता बहुउद्देशीय हॉल बांधणेसाठी र.रु.२० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
| --- | --- | --- |
| १) १२.भवने, भूमी व मनपा वसाहती यांची व्यवस्था, पान क्र. ११०, अ.क्र. ७, शहरामध्ये विविध ठिक़ाणी सिमाभिंत बांधणे, भवन विभागांतर्गत विविध विकासाची कामे करणे (यादी क्र. एसजे १०), पान क्र.२५२, अ.क्र.२५१, प्रभाग क्र.२८ ड मध्ये विविध ठिकाणी ज्येष्ठ नागरिकांकरीता वाचनालय विकसित करणे | १० लाख | --- |
| २) १६.उद्याने, प्राणीसंग्रहालये, पान क्र. ११२, अ.क्र. ५, शहरातील विविध उद्यानांमध्ये विकास कामे करणे, (यादी एसयु १), पान क्र.२७५, अ.क्र.१४०, प्रभाग क्र.२८ ड मध्ये अरुणा असेफ अली गार्डन व विठाबाई पुजारी गार्डन येथे रिव्हर्स ऑसमोसिस वॉटर प्लांट पुरविणे व बसविणे | १० लाख | --- |
| नविन सुचविलेले काम- प्रभाग क्र.२८ ड येथील कलाभूमीचे शेजारील जागेमध्ये ज्येष्ठ नागरिकांसाठी व जिम करीता बहुउद्देशीय हॉल बांधणे | --- | २० लाख |

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महा.आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.

## मा.विधी समितीचा ठराव

**विषय क्र. ११३२**

संदर्भ – १) मा.रघुनाथ गौडा व मा.महेश वाबळे यांचे ०९/१०/१८ यांचे पत्र.

२) विधी समिती ठराव क्र.१९ दिनांक १८/१०/१८

३) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र. मआ/सा.प्र/१०९४ दिनांक.१४/०१/१९ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी.

४) मा.प्रदिप ओसवाल ,सौ.रत्नप्रभा जगताप,सौ. स्वप्नाली सायकर व मा.रफिक शेख यांची दिनांक २४/०१/२०१९ ची उपसुचना.

५) विधी समिती ठराव क्र.२६ दिनांक २४/१/२०१९

----

मा.महापालिका आयुक्त अभिप्राय अवलोकन करुन तसेच मा.विधी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

मुख्य लेखा व वित्त विभागाकडील मंजुर असलेला उपमुख्य लेखा व वित्त अधिकारी या पदनामाच्या एकुण ४ जागे पैकी एका जागेवर नेमणूक घेणेस योग्य अशी मनपा सेवेतील काम करणा-या व्यक्तीची पदवी C.A (सनदी लेखापाल) अशी आसावी तर त्या सदर व्यक्तीला पदन्नोत्ती देण्यात यावी अशी दुरुस्ती सेवा नियमात करण्यास मान्यता द्यावी अशी मुख्य सभेकडे शिफारस आहे.

## मा.शहर सुधारणा समितीचे ठराव

**विषय क्र. ११३३**

संदर्भ – १) पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण,पुणे यांचेकडील जाहिर सूचना जा.क्र.पीएल/वियो–पुमप्र /०६– २०१७/प्र.क्र.३६/शाखा–१/१३३दि.१९.०६.२०१७

२) महाराष्ट्र शासन राजपत्र क्र.पीएमसी–३०१४/प्र.क्र.६४/नवि–२२,दि. ०४/१०/२०१७.

३) मा.मुख्य सभा ठ.क्र.१६०,दि.२८/६/२०१८ अन्वये इरादा जाहिर करणेस मिळालेली मान्यता.

४) पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण,पुणे यांचे पत्र क्र. विप/नरयो–रिंगरोड/११०–२०१७/प्र. क्र.४७/शाखा–१,दि.०५.१०.१८(आवक क्र. शहर अभियंता/१०६७०,दि.१६/१०/२०१८.)

५) मा. भारत सरकार, आवसन और शहरी कार्य मंत्रालय यांचे पत्र k-14011/01/2017- LSG/ AMRUT-IIA Dt. August20,2018

६) मा. अवरसचिव महाराष्ट्र शासन, यांचे पत्र जा.क्र. टीपीएस–१८१७/१८२७/नवि–१३, दि.०८/०२/२०१८

७) मा. महापालिका आयुक्त यांचे जा.क्र. मआ/डीपीसेल/७४३,दि.२८.११.२०१८

८) मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र.३२९, दि.१०/१/२०१९

विषय – पुणे महानगरपालिका हद्दीत नव्याने समाविष्ट झालेल्या ११ गावांपैकी उरळी देवाची व फुरसुंगी या गावामधून जाणा–या ११० मी. रूंद बाह्यवळण रस्त्याच्या भूसंपदनासाठी नगर रचना परियोजना राबविणेबाबत.

–––

मा. महापालिका आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून–

दि. ०४.१०.२०१७ च्या अधिसूचनेनुसार पुणे महानगरपालिका हद्दीत ११ गावे समाविष्ट झाली आहेत. त्यांचा विकास आराखडा तयार करण्यासाठी पुणे महानगरपालिका नियोजन प्राधिकरण असल्याने कार्यवाही सुरू केलेली आहे. या समाविष्ट ११ गावांपैकी फुरसुंगी व उरळी देवाची या दोन गावांमधील बाह्यवळण ११० मी. रूंद रस्त्याच्या भूसंपादनासाठी नगर रचना परियोजना राबविण्यास मान्यता दयावी अशी मा. मुख्य सभेकडे शिफारस आहे.

१. महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ५९ नुसार कलम ६०(१) अन्वये हद्दीचा नकाशा मा.महापालिका आयुक्त यांच्यापत्रासोबत दर्शविल्याप्रमाणे नगर रचना परियोजना राबविणेस.

२. महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ६०(२) अन्वये इरादा शासकीय राजपत्रात व दैनिक वर्तमानपत्रात जाहीर करणेस.

**विषय क्र. ११३४**

संदर्भ – १.मा.योगेश ससाणे यांचे दि.११/५/२०१७ चे पत्र

२.शहर सुधारणा समिती ठ.क्र.६८ दि.२६/५/२०१७

३.मा.मारूती तुपे, मा.योगेश ससाणे व मा.सौ.उज्वला जंगले यांचे दि.१२/९/२०१७ चे पत्र

४.शहर सुधारणा समिती ठ.क्र.२१३ दि.२२/९/२०१७

५.मा.मारूती तुपे, मा.योगेश ससाणे व मा.संजय घुले यांचे दि.११/१२/२०१७ चे पत्र

६.शहर सुधारणा समिती ठ.क्र.४१८ दि.२२/१२/२०१७

७.मा.मारूती तुपे, मा.योगेश ससाणे व मा.संजय घुले यांचे दि.११/१२/२०१७ चे पत्र

८.शहर सुधारणा समिती ठ.क्र.४१९ दि.२२/१२/२०१७

९.मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/श.अ./७५८ दि.२९.११.२०१८ ने पाठविलेला अभिप्राय

१०.मा.भैयासाहेब जाधव व मा.अजय खेडेकर यांचे दि.१०.१.२०१९ ची उपसूचना

११.मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र.३४७, दि.१०/१/२०१९

–––

मा.शहर सुधारणा समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून...

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम कलम २०५ व २०५ क अन्वये हडपसर स.नं.२३१ ते स.नं.४३ ब दरम्यान रेल्वे पटरीपर्यंत १२.०० मी.रूंद रस्ता करण्याचा प्रस्ताव आहे.सदर रस्त्याची रूंदी ही तेथील वाहतुकीच्या दृष्टीने काहीशी कमी/अपुरी वाटते त्यामुळे तेथील वाहतुकीचा विचार करता सदर रस्त्याची रूंदी ही कमीत कमी १८.०० मी. इतकी करण्यास मान्यता दयावी अशी मा. मुख्य सभेकडे शिफारस आहे.

<u>विषय क्र. ११३५</u>

संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.म.आ./उदयान/८८२ दि.२४.१२.२०१८ ने पाठविलेला अभिप्राय

२) मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र.३५२, दि.१०/१/२०१९

विषय– शिवाजीनगर येथील पुणे महानगरपालिकेच्या छ.संभाजी महाराज उदयानात येथे छ.संभाजी महाराज यांचे पूर्ण आकृती पुतळा बसविणेबाबत

––––

मा.महापालिका आयुक्त यांनी त्यांच्या पत्रात दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेऊन...

मा.शासन निर्णयानुसार शिवाजीनगर येथील पुणे महानगरपालिकेच्या छ.संभाजी महाराज उदयानात छ.संभाजी महाराज यांचे बुधभूषण ग्रंथ रचतानाचे ब्रांझ (गनमेटल) मधील पुतळयाचे शिल्प उभारणे कामी मान्यता मिळणेस व पुतळा समिती कडे अर्ज करण्यास मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

<u>विषय क्र. ११३६</u>

संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/शअ/टिडीआर/९७८,दि.३/१/२०१९ चे पत्र.

२) मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र.३५५, दि.१०/१/२०१९

––––

पुणे महानगरपालिकेकडून विविध कारणांमुळे जागा संपादन करताना देण्यात आलेल्या माहे डिसेंबर २०१८ मध्ये खालीलप्रमाणे अदा करणेत आलेल्या टी.डी.आर.ची माहिती मुख्य सभेकडे अवलोकनार्थ सादर करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

| अ. क्र. | मिळकतीचा तपशील | आरक्षणाचा प्रकार | डी.आर.सी. होल्डरचे नाव | टिडी आर झोन | टिडीआर देय क्षेत्र चौ.मी. | डीआर सी क्र. | डीआरसी दिल्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | पुणे पेठ मंगळवार, फायनल प्लॉट क्र. ५५ सब प्लॉ.क्र. ५,६,७,८ व १०, ११ | झोपडपटटी पुनर्वसन योजना | मे. तारा कन्स्ट्रक्शन्स | ए | २०७२.६३ चौ.मी. (इमारती ए ला अंतर्गत अंतिम भोगवटा प्रमाणपत्र अदा केलेपोटी ३०% देय टी.डी.आर) | ००४५३१ | डिसेंबर २०१८ |

<u>विषय क्र.११३७</u>

संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/शअ/टिडीआर/९८०,दि.३/१/२०१९ चे पत्र.

२) मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र.३५७, दि.१०/१/२०१९

––––

पुणे महानगरपालिकेकडून विविध कारणांमुळे जागा संपादन करताना देण्यात आलेल्या माहे डिसेंबर २०१८ मध्ये खालीलप्रमाणे अदा करणेत आलेल्या टी.डी.आर.ची माहिती मुख्य सभेकडे अवलोकनार्थ सादर करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

| अ. क्र. | मिळकतीचा तपशील | आरक्षणाचा प्रकार | डी.आर.सी. होल्डरचे नाव | टिडी आर झोन | टिडीआर देय क्षेत्र चौ.मी. | डीआर सी क्र. | डीआरसी दिल्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | सि.स.नं.११३२, स.नं.२६/३क,२६/३ड बोपोडी पुणे | झोपडपटटी पुनर्वसन योजना | मे. साई इन्फ्रा | सी | ३२७३.७९ चौ.मी. (इमारतीचे आर सी सी व वीट बांधकामापोटी ३५% देय टी.डी.आर) | ००४५३० | डिसेंबर २०१८ |

<u>विषय क्र. ११३८</u>

संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/शअ/टिडीआर/९८१,दि.३/१/२०१९ चे पत्र.

२).मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र.३५८, दि.१०/१/२०१९

––––

पुणे महानगरपालिकेकडून विविध कारणांमुळे जागा संपादन करताना देण्यात आलेल्या माहे डिसेंबर

२०१८ मध्ये खालीलप्रमाणे अदा करणेत आलेल्या टी.डी.आर.ची माहिती मुख्य सभेकडे अवलोकनार्थ सादर करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

| अ क्र. | मिळकतीचा तपशील | आरक्षणाचा प्रकार | डी.आर.सी. होल्डरचे नाव | टिडी आर झोन | टिडीआर देय क्षेत्र चौ.मी. | डीआरसी क्र. | डीआरसी दिल्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | स.नं.४६पैकी ४७ पैकी,सि.स.नं. १७२१,१७२३ ते १७२७ कोथरूड, श्रावणधारा, पुणे | झोपडपटटी पुनर्वसन योजना | किर्तीवर्धन डेव्हलपर्स अँड बिल्डर्स | सी | ११२००.३१ चौ.मी. (इमारतीचे सी चे आर सी सी व वीट बांधकाम पूर्ण झालेपोटी देय होणारा ३५% टी.डी.आर) | ००४५३९ | डिसेंबर २०१८ |

<u>विषय क्र. ११३९</u>

संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/शअ/टिडीआर/९८२,दि.३/१/२०१९ चे पत्र.

२).मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र.३५९, दि.१०/१/२०१९

----

पुणे महानगरपालिकेकडून विविध कारणांमुळे जागा संपादन करताना देण्यात आलेल्या माहे डिसेंबर २०१८ मध्ये खालीलप्रमाणे अदा करणेत आलेल्या टी.डी.आर.ची माहिती मुख्य सभेकडे अवलोकनार्थ सादर करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

| अ. क्र. | आरक्षणाचा स.नं. | आरक्षणाचा प्रकार | डी.आर.सी. होल्डरचे नाव | टिडी आर झोन | ७/१२ नुसार क्षेत्र | टिडीआर देय क्षेत्र चौ.मी. | डीआर सी क्र. | डीआरसी दिल्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | पुणे पेठ पाषाण (सुतारवाडी)स.नं. ११८,हि.नं.२३, २४/१(स.नं.११८ हि.नं.२२,२३,२४ मान्य एकत्रिकरणा नुसार)सि.स.नं. १३११ (पै.) | १२ मी. डी.पी. रस्ता | श्री निवृत्ती रंगनाथ कोकाटे व इतर तर्फे कुलमुखत्यारधारक मे.शंभू डेव्हलपर्स तर्फे भागीदार १.विजय जयवंत काळे २.वृषाली विजय काळे ३.अक्षय विजय काळे ४.संगिता चंद्रशेखर काळे ५.अथर्व चंद्रशेखर काळे | विरळ वस्ती | ५१.०९ चौ.मी. | ५१.०० चौ.मी. X २.००= १०२.०० चौ. मी.(५१.०९ चौ.मी. क्षेत्राचा ताबा जरी पुणे मनपास जरी प्राप्त झाला असला तरी ७/१२ उता-यावरील नोंदीनुसार अनुज्ञेय क्षेत्र ५१.०० चौ.मी.) | ००५४७७ | डिसेंबर २०१८ |

<u>विषय क्र. ११४०</u>

संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/शअ/टिडीआर/९७१,दि.२/१/२०१९ चे पत्र.

२) मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र.३६०, दि.१०/१/२०१९

----

पुणे महानगरपालिकेकडून विविध कारणांमुळे जागा संपादन करताना देण्यात आलेल्या माहे डिसेंबर २०१८ मध्ये खालीलप्रमाणे अदा करणेत आलेल्या टी.डी.आर.ची माहिती मुख्य सभेकडे अवलोकनार्थ सादर करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

| अ. क्र. | मिळकतीचा तपशील | आरक्षणाचा प्रकार | डी.आर.सी. होल्डरचे नाव | टिडी आर झोन | टिडीआर देय क्षेत्र चौ.मी. | डीआर सी क्र. | डीआरसी दिल्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | टी.पी.स्कीम नं.१,फा. प्ला.क्र.५७६/३,४,५,९, १०,सि.स.नं.१२१६/३ ४,५,९,१० भांबुर्डा, शिवाजीनगर, पुणे | झोपडपटटी पुनर्वसन योजना | मे.नमन डेव्हलपर्स | ए | ३३६.२०७ चौ.मी. (इमारत बी चे जोते तपासणी पोटी अनुज्ञेय टी.डी.आर) | ००४५३७ | डिसेंबर २०१८ |

विषय क्र. ११४१

संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/शअ/टिडीआर/९६९,दि.२/१/२०१९ चे पत्र.

२).मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र.३६१, दि.१०/१/२०१९

––––

पुणे महानगरपालिकेकडून विविध कारणांमुळे जागा संपादन करताना देण्यात आलेल्या माहे नोव्हेंबर २०१८ मध्ये खालीलप्रमाणे अदा करणेत आलेल्या टी.डी.आर.ची माहिती मुख्य सभेकडे अवलोकनार्थ सादर करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

| अ. क्र. | मिळकतीचा तपशील | आरक्षणाचा प्रकार | डी.आर.सी. होल्डरचे नाव | टिडी आर झोन | टिडीआर देय क्षेत्र चौ.मी. | डीआर सी क्र. | डीआरसी दिल्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1. | पुणे पेठ हडपसर स.नं.११०अ/1 हिस्सा क्र. ४+९ब +12 रामटेकडी | झोपडपटटी पुनर्वसन योजना | मे.नाईकनवरे डेव्हलपर्स प्रा.लि. | सी | ६८३८.६३चौ.मी. (इमारत सी चे वीट बांधकाम व आर सी सी बांधकामापोटी देय ३५% टी.डी.आर) | ००४५३२ | नोव्हेंबर २०१८ |

विषय क्र. ११४२

संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/शअ/टिडीआर/९७०,दि.२/१/२०१९ चे पत्र.

२).मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र.३६२, दि.१०/१/२०१९

––––

पुणे महानगरपालिकेकडून विविध कारणांमुळे जागा संपादन करताना देण्यात आलेल्या माहे डिसेंबर २०१८ मध्ये खालीलप्रमाणे अदा करणेत आलेल्या टी.डी.आर.ची माहिती मुख्य सभेकडे अवलोकनार्थ सादर करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

| अ. क्र. | मिळकतीचा तपशील | आरक्षणाचा प्रकार | डी.आर.सी. होल्डरचे नाव | टिडी आर झोन | टिडीआर देय क्षेत्र चौ.मी. | डीआर सी क्र. | डीआरसी दिल्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | फा.प्ला.क्र.५२८/१५ (स.नं.१३२ अ (पार्ट), पर्वती पुणे | झोपडपटटी पुनर्वसन योजना | मे.ओंकार इनव्हेस्टमेंटस् | बी | १५०७.७०चौ.मी. (अंतिम भोगवटा प्रमाणपत्रापोटी देय ३०% अनुज्ञेय टी.डी.आर) | ००४५३८ | डिसेंबर २०१८ |

विषय क्र. ११४३

संदर्भ – १) मा. राजेश किसन बराटे यांचे दि.११/१/२०१९ चे पत्र

२).मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र.३६९, दि.२४/१/२०१९

––––

मा.शहर सुधारणा समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून...

स.नं.११/२, कर्वेनगर येथील खेळाच्या मैदानासाठी आरक्षित असलेल्या जमिनीवरचे आरक्षण उठवून ते निवासी केल्याचे आढळते. तरी वरील ठिकाणचे आरक्षण हे कर्वेनगर भागातील नागरिकांना आवश्यक असल्याने ते कायम ठेवावे. सदर जमिनीवर कोणताही प्लॅन पास होऊ नये अगर झाला असल्यास रद्द करावा अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

<u>विषय क्र. ११४४</u>

संदर्भ – १) मा. अजय खेडेकर व मा. सौ.मंजुषा नागपुरे यांचे दि.१६/१/२०१९ चे पत्र

२).मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र.३७१, दि.२४/१/२०१९

––––

मा.शहर सुधारणा समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून...

पुणे महानगरपालिकेच्या पथ विभागाकडे श्री. कौशल अरूणराव सराफ हे कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) पदावर काम करीत असून त्यांनी आजपर्यंत सदर पदाचे काम उत्कृष्ठरित्या केलेले असून त्यांची सेवा निष्कलंक आहे. त्यांच्या पत्नी सौ.कांचन कौशल सराफ या कोराडी औ. विद्युत केंद्र नागपुर येथे कनिष्ठ अभियंता म्हणून कार्यरत आहेत. श्री. कौशल अरूणराव सराफ यांना पती – पत्नी एकत्रीकरण व पुणे महानगरपालिका सेवा ( सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम २०१४ च्या अन्वये पुणे महानगरपालिका येथून नागपुर महानगरपालिका येथे राज्य शासनाच्या मान्यतेने बदली करण्यात यावी.अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

<u>विषय क्र. ११४५</u>

संदर्भ – १) मा.दिलीप वेडेपाटील व मा. अजय खेडेकर यांचे दि.१६/१/२०१९ चे पत्र

२).मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र.३७२, दि.२४/१/२०१९

––––

मा.शहर सुधारणा समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून...

पुणे महानगरपालिकेच्या भवन विभागाकडे श्री.सिध्दार्थ धोंडीराम यादव हे कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) पदावर काम करीत असून त्यांनी आजपर्यंत सदर पदाचे काम उत्कृष्ठरित्या केलेले असून त्यांची सेवा निष्कलंक आहे. त्यांच्या पत्नी सौ.स्नेहलता सिध्दार्थ यादव या बृहन्मुंबई महानगरपालिकेमध्ये लॅब टेक्निशियन म्हणून काम करीत आहेत. त्यांचे राहते घर मुंबईला असून त्यांना दोन वर्षाचा लहान मुलगा आहे तसेच श्री यादव यांचे आईवडील वयोवृध्द असून ते सतत आजारी असतात व श्री यादव हे पुण्यात नोकरीस असल्यामुळे व त्यांचे संपूर्ण कुटुंब मुंबईस असल्याने त्यांना त्यांच्या कुटुंबियांसाठी पुरेसा वेळ देता येत नाही.

तरी श्री.सिध्दार्थ धोंडीराम यादव यांची पुणे महानगरपालिकेकडून पनवेल शहर महानगरपालिकेकडे विशेष बाब म्हणून राज्य शासनाच्या मान्यतेने बदली करण्यात यावी. अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

<u>विषय क्र. ११४६</u>

संदर्भ – १) मा.दिलीप वेडेपाटील व मा. अजय खेडेकर यांचे दि.१६/१/२०१९ चे पत्र

२) मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र.३७३, दि.२४/१/२०१९

––––

मा.शहर सुधारणा समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून –

श्री.मयुर शाम करंजखेले हे कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) पदावर बृहन्मुंबई महानगरपालिकेमध्ये सध्या काम करीत असून त्यांनी आजपर्यंत सदर पदाचे काम उत्कृष्ठरित्या केलेले असून त्यांची सेवा निष्कलंक आहे. त्यांचे राहते घर पुण्याला असून तेथे राहणारे आईवडील वयोवृध्द असून त्यांची आई सतत आजारी असतात. त्यांच्या पत्नीदेखील पुणे येथे नोकरीस आहेत. श्री करंजखेले हे मुंबईत नोकरीस असल्यामुळे व त्यांचे संपूर्ण कुटुंब पुण्यात असल्याने त्यांना त्यांच्या कुटुंबियांसाठी पुरेसा वेळ देता येत नाही.

तरी श्री.मयुर शाम करंजखेले यांची बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून पुणे महानगरपालिकेकडे विशेष बाब म्हणून राज्य शासनाच्या मान्यतेने बदली करण्यात यावी. अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

<u>विषय क्र. ११४७</u>

संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/शअ/टिडीआर/१००९,दि.७/१/२०१९ चे पत्र.

२) मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र.३८०, दि.२४/१/२०१९

––––

पुणे महानगरपालिकेकडून विविध कारणांमुळे जागा संपादन करताना देण्यात आलेल्या माहे डिसेंबर २०१८ मध्ये खालीलप्रमाणे अदा करणेत आलेल्या टी.डी.आर.ची माहिती मुख्य सभेकडे अवलोकनार्थ सादर करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

| अ. क्र. | मिळकतीचा तपशील | आरक्षणाचा प्रकार | डी.आर.सी. होल्डरचे नाव | टिडी आर झोन | टिडीआर देय क्षेत्र चौ.मी. | डीआर सी क्र. | डीआरसी दिल्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | स.नं.५३९ अ फा. प्लॉ. क्र.१६३ व १६३ अ घोरपडे पेठ, पुणे | झोपडपटटी पुनर्वसन योजना | मे. अंजुमन–ए–ताहेरी | ए | १२५३.९६ चौ.मी. (इमारती ए चे जोते तपासणी पोटी २५% अनुज्ञेय टी.डी.आर) | ००४५३६ | डिसेंबर २०१८ |

विषय क्र. ११४८

संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/शअ/टिडीआर/१००८,दि.७/१/२०१९ चे पत्र.

२) मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र.३८१, दि.२४/१/२०१९

----

पुणे महानगरपालिकेकडून विविध कारणांमुळे जागा संपादन करताना देण्यात आलेल्या माहे डिसेंबर २०१८ मध्ये खालीलप्रमाणे अदा करणेत आलेल्या टी.डी.आर.ची माहिती मुख्य सभेकडे अवलोकनार्थ सादर करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

| अ. क्र. | आरक्षणाचा सर्व्हे नंबर | आरक्षणाचा प्रकार | डी.आर.सी. होल्डरचे नाव | टिडी आर झोन | ७/१२ उताऱ्यानुसार क्षेत्र | टिडीआर देय क्षेत्र चौ.मी. | डीआर सी क्र. | डीआरसी दिल्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | पुणे धायरी, स.नं.१५४/३ ( पैकी) | ३० मी. डी.पी. रस्ता व ओ. एम – ४१ | मे. सागर डेव्हलपर्स तर्फे भागीदार श्री. शेषराम नैनाजी चौधरी आणि पुनाराम लच्छाजी चौधरी | विरळ वस्ती | ९४४.९८ चौ.मी. | ९४४.९८ चौ.मी. x २.०० = १८८९.९६ चौ.मी. | ओटा मार्केट–४१ = ६१५.८२ चौ.मी. करिता डीआरसी क्र.००५४५९ | डिसेंबर २०१८ |
| | | | | | | | ३० मी.डी.पी. रस्ता = २२५.१४ चौ.मी. करिता डीआरसी क्र.००५४६० | |
| | | | | | | | ३० मी.डी.पी. रस्ता = १०४९.०० चौ.मी. करिता डीआरसी क्र.००५४६१ | |

विषय क्र. ११४९

संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/शअ/टिडीआर/१०१०,दि.७/१/२०१९ चे पत्र.

२) मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र.३८२, दि.२४/१/२०१९

----

पुणे महानगरपालिकेकडून विविध कारणांमुळे जागा संपादन करताना देण्यात आलेल्या माहे डिसेंबर २०१८ मध्ये खालीलप्रमाणे अदा करणेत आलेल्या टी.डी.आर.ची माहिती मुख्य सभेकडे अवलोकनार्थ सादर करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

| अ. क्र. | आरक्षणाचा सर्व्हे नंबर | आरक्षणाचा प्रकार | डी.आर.सी. होल्डरचे नाव | टिडी आर झोन | ७/१२ उताऱ्यानुसार क्षेत्र | टिडीआर देय क्षेत्र चौ.मी. | डीआर सी क्र. | डीआरसी दिल्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | पुणे हडपसर, स.नं.१५९ अ, हि.नं.६( पैकी) | १२ मी.डी.पी. रस्ता | मोहन नाथू कापरे, सतिश नाथू कापरे, अर्जुन नाथू कापरे, नितीन शिवाजी कापरे निलेश शिवाजी कापरे | विरळ वस्ती | ४५९.२४ चौ.मी. | ४५९.२४ चौ.मी. x २.०० = ९१८.४८ चौ.मी. | ००५३९० | डिसेंबर २०१८ |

विषय क्र. ११५०

संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/शअ/टिडीआर/१०११,दि.७/१/२०१९ चे पत्र.

२) मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र.३८३, दि.२४/१/२०१९

----

पुणे महानगरपालिकेकडून विविध कारणांमुळे जागा संपादन करताना देण्यात आलेल्या माहे नोव्हेंबर २०१८ मध्ये खालीलप्रमाणे अदा करणेत आलेल्या टी.डी.आर.ची माहिती मुख्य सभेकडे अवलोकनार्थ सादर करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

| अ. क्र. | आरक्षणाचा सर्व्हे नंबर | आरक्षणाचा प्रकार | डी.आर.सी. होल्डरचे नाव | टिडी आर झोन | ७/१२ उतान्यानुसार क्षेत्र | टिडीआर देय क्षेत्र चौ.मी. | डीआर सी क्र. | डीआरसी दिल्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | पुणे पेठ पाषाण (सुतारवाडी) स.नं.११८, हि.नं.२२, सिटीएस नं.१३११ (पै.) | १२ मी. डी.पी. रस्ता | श्री निवृत्ती रंगनाथ कोकाटे व इतर तर्फे कुलमुखत्यारधारक मे.शंभू डेव्हलपर्स तर्फे भागीदार १.विजय जयवंत काळे २.वृषाली विजय काळे ३.अक्षय विजय काळे ४.संगिता चंद्रशेखर काळे ५.अथर्व चंद्रशेखर काळे | विरळ वस्ती | १३५.२५ चौ.मी. | १३५.२५ चौ.मी. X २.०० = २७०.५ चौ.मी. | ००५४७६ | नोव्हेंबर २०१८ |

<u>विषय क्र. ११५१</u>

संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/शअ/टिडीआर/१०१२,दि.७/१/२०१९ चे पत्र.

२) मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र.३८४, दि.२४/१/२०१९

––––

पुणे महानगरपालिकेकडून विविध कारणांमुळे जागा संपादन करताना देण्यात आलेल्या माहे डिसेंबर २०१८ मध्ये खालीलप्रमाणे अदा करणेत आलेल्या टी.डी.आर.ची माहिती मुख्य सभेकडे अवलोकनार्थ सादर करण्यास मान्यता देण्यात येत आहे

| अ. क्र. | आरक्षणाचा सर्व्हे नंबर | आरक्षणाचा प्रकार | डी.आर.सी. होल्डरचे नाव | टिडीआर झोन | ७/१२ उतान्या नुसार क्षेत्र | टिडीआर देय क्षेत्र चौ.मी. | डीआर सी क्र. | डीआरसी दिल्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | पुणे कोथरूड, सि.स.नं.३८९ | व्हेजिटेबल मार्केट (व्हीएम–१७) | सौ. जयश्री अरविंद सुर्यवंशी | दाट वस्ती | १४०.५० चौ.मी. | १४०.५० चौ.मी. X ३.१५ = ४४२.५७५ चौ.मी. | ००५४९० | डिसेंबर २०१८ |
| २ | पुणे कोथरूड, सि.स.नं.३९२ | | | | ८५.०० चौ.मी. | ८५.०० चौ.मी. X ३.१५ = २६७.७५ चौ.मी. | ००५४९१ | |

<u>विषय क्र. ११५२</u>

संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/शअ/टिडीआर/१०१३,दि.७/१/२०१९ चे पत्र.

२) मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र.३८५, दि.२४/१/२०१९

––––

पुणे महानगरपालिकेकडून विविध कारणांमुळे जागा संपादन करताना देण्यात आलेल्या माहे डिसेंबर २०१८ मध्ये खालीलप्रमाणे अदा करणेत आलेल्या टी.डी.आर.ची माहिती मुख्य सभेकडे अवलोकनार्थ सादर करण्यास मान्यता देण्यात येत आहे

| अ. क्र. | आरक्षणाचा सर्व्हे नंबर | आरक्षणाचा प्रकार | डी.आर.सी. होल्डरचे नाव | टिडी आर झोन | ७/१२ उतान्यानुसार क्षेत्र | टिडीआर देय क्षेत्र चौ.मी. | डीआर सी क्र. | डीआरसी दिल्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | पुणे बाणेर, स.नं.४८/३/४ | गार्बेज प्रोसेसिंग प्लांट (जीपीपी– व ३० मी.डी.पी. रस्त्याने) | मे.कुणाल डेव्हलपर्स तर्फे भागीदार १.हेमेंद्र डाहयाभाई शहा २.रमेश गिरधरदास शहा | विरळ वस्ती | २००.०० चौ.मी. | २००.०० चौ.मी. X २.०० = ४००.०० चौ.मी. | ००५४८२ | डिसेंबर २०१८ |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २ | पुणे बाणेर, स.नं.४८/३/५ | गार्बेज प्रोसेसिंग प्लांट (जीपीपी– व ३० मी.डी.पी. रस्त्याने) | मे.कुणाल डेव्हलपर्स तर्फे भागीदार १.हेमेंद्र डाहयाभाई शहा २.रमेश गिरधरदास शहा | विरळ वस्ती | २००.०० चौ.मी. | २००.०० चौ.मी. x २.०० = ४००.०० चौ.मी. | ००५४८३ | डिसेंबर २०१८ |
| ३ | पुणे बाणेर, स.नं.४८/३/६ | गार्बेज प्रोसेसिंग प्लांट (जीपीपी– व ३० मी.डी.पी. रस्त्याने) | मे.कुणाल डेव्हलपर्स तर्फे भागीदार १.हेमेंद्र डाहयाभाई शहा २.रमेश गिरधरदास शहा | विरळ वस्ती | १००.०० चौ.मी. | १००.०० चौ.मी. x २.०० = २००.०० चौ.मी. | ००५४८४ | डिसेंबर २०१८ |
| ४ | पुणे बाणेर, स.नं.४८/३/७ | गार्बेज प्रोसेसिंग प्लांट (जीपीपी– व ३० मी.डी.पी. रस्त्याने) | मे.कुणाल डेव्हलपर्स तर्फे भागीदार १.हेमेंद्र डाहयाभाई शहा २.रमेश गिरधरदास शहा | विरळ वस्ती | १००.०० चौ.मी. | १००.०० चौ.मी. x २.०० = २००.०० चौ.मी. | ००५४८५ | डिसेंबर २०१८ |

**विषय क्र. ११५३**

संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/शअ/टिडीआर/१०४४,दि.९/१/२०१९ चे पत्र.

२) मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र.३८६, दि.२४/१/२०१९

––––

पुणे महानगरपालिकेकडून विविध कारणांमुळे जागा संपादन करताना देण्यात आलेल्या माहे डिसेंबर २०१८ मध्ये खालीलप्रमाणे अदा करणेत आलेल्या टी.डी.आर.ची माहिती मुख्य सभेकडे अवलोकनार्थ सादर करण्यास मान्यता देण्यात येत आहे

| अ.क्र. | आरक्षणाचा सर्व्हे नंबर | आरक्षणाचा प्रकार | डी.आर.सी. होल्डरचे नाव | टिडी आर झोन | ७/१२ उतान्यानुसार क्षेत्र | टिडीआर देय क्षेत्र चौ.मी. | डीआर सी क्र. | डीआरसी दिल्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | पुणे बाणेर, स.नं.३२/१ब | २४ मी.डी.पी. रस्ता | मे. श्रेयस बिल्डर्स तर्फे श्री. राजेंद्र वसंत मेकल | विरळ वस्ती | २११.३१ चौ.मी. | २११.३१ चौ.मी. x २.०० = ४२२.६२ चौ.मी. | ००५४६३ | डिसेंबर २०१८ |

## नाव समितीचे निवेदन

**विषय क्र. ११५४**

पुणे मनपा हद्दीतील उद्याने,रस्ते, पूल, चौक इत्यादी सार्वजनिक ठिकाणांना योग्य त्या नावांची शिफारस करण्याबाबत दि.१९/१/२०१९ रोजी दुपारी ०३ =३० ( साडे तीन ) वाजताचे नाव समितीचे निवेदन विचारासाठी.

## मा.सभासदांचे प्रस्ताव

**विषय क्र. ११५५**

संदर्भ – मा. सौ. निलिमा खाडे व मा. सौ. कविता वैरागे यांची सूचना दिनांक१६/१/२०१९.

१) मा.महा.आयुक्त यांचे क्रं.मआ/नअ/१२११,दि.११/११/९६ चे पत्र.

२) स्थायी समिती ठ.क्र.१२४४,दि.१९/११/९६

–––

मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेऊन –

पुणे शिवाजीनगर फा.प्लॉ.नं.६६० जंगली महाराज रोड येथील पुणे मनपाच्या ताब्यातील एकूण क्षेत्रफळाच्या ५० टक्के जागा मूळ मालकांस मुंबई प्रांतिक महापालिका अधिनियम १९४९ चे कलम ७९ नुसार परत करणेस, तसेच पुणे मनपाच्या विकास नियंत्रण नियमावली मधील प्रस्तावित बदला नुसार प्लॉटच्या क्षेत्रफळा इतके ( म्हणजे २१०२.३८ चौ.मी.इतके ) पार्किंगचे क्षेत्र बेसमेंट/स्टिल्ट मध्ये मनपा सुचविल त्यानुसार विनामूल्य बांधून ताब्यात देण्याबाबत योग्य त्या अटीनुसार करार करण्यास मा.महापालिका आयुक्त यांना अधिकार देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

असा मनपा ठराव क्र.५०९, दिनांक २६/१२/१९९६ चा ठराव मान्य झाला असून सदर ठरावाचा फेरविचार करुन खालीलप्रमाणे ठराव मान्य करण्यात यावा.

संदर्भ – १) मा.महा.आयुक्त यांचे क्रं.मआ/नअ/१२११,दि.११/११/९६ चे पत्र.
२) स्थायी समिती ठ.क्र.१२४४,दि.१९/११/९६

---

महामेट्रोने जंगली महाराज रस्त्यावरील प्रस्तावित मेट्रोमार्ग नदीपात्रामध्ये स्थलांतरीत केलेला असल्याचे प्रकल्प विभागात कळविले आहे. यास्तव शिवाजीनगर फा.प्लॉ.नं.६६० येथील मेट्रोस्टेशन ऐवजी बहुमजली पार्किंग मान्य डी.सी.पी.आर. मधील कलम १६.१६ मधील तरतुदीनुसार विकसीत करणे शक्य आहे. तरी यापुर्वी झालेला मा.मुख्य सभा ठराव क्र.५०९, दि. २६/१२/१९९६ नुसार मान्य करण्यात आलेला ठराव निरस्त करण्यात यावा व पुणे शिवाजीनगर फा.प्लॉ.नं.६६० जंगली महाराज रस्ता याठिकाणी पुणे महानगरपालिकेकडून बहुमजली पार्किंग विकसित करण्यास मान्यता देण्यात यावी.

<u>विषय क्र. ११५६</u>

संदर्भ – मा. महेश लडकत व मा. मारुती सांगडे यांची सूचना दिनांक ३०/१/२०१९.
१) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र. मआ/टिजीओ/७८७, दि.७/१२/२०१८ रोजीचे पत्र.

----

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या (सुधारित) चे शुडयल डी मधील प्रकरण ८ (करनियमन) चे नियम ७ (१) नुसार महापालिकेकडून देण्यात येणारी १५ टक्केची वजावट १० टक्के करणेबाबतचा मुख्य सभा ठराव क्र.५, दि.३/४/१९७० विखंडीत केलेबाबत शासन निर्णय क्रमांक पीएमसी–३०१८/प्र.क्र.५९३ /नवि–२२ मंत्रालय, मुंबई–४०००३२, दि.२५/१०/२०१८ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५१(१) नुसार निलंबित करण्यात येत आहे. याबाबत ३० दिवसांच्या आत शासनास सादर करणेबाबतची बाब निदर्शनास आणल्याची नोंद घेण्यात येत आहे.
असा मनपा ठराव क्र.११०४,दिनांक २३/१/२०१९ चा ठराव मान्य झाला असून सदर ठरावाचा फेरविचार करुन खालीलप्रमाणे ठराव मान्य करण्यात यावा.

संदर्भ – १) मा. मुख्य सभा ठराव क्र. ५, दिनांक ३/४/१९७०
२) शासन निर्णय क्र. पीएमसी–३०१८/प्र.क्र.५९३/नवि–२२ मंत्रालय मुंबई ४०००३२ दिनांक २५/१०/१८.
३) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र. मआ/टिजीओ/७८७, दि.७/१२/२०१८ रोजीचे पत्र.

---

दिनांक १/४/२०१९ पासून नव्याने आकारणी करण्यात येणाऱ्या मिळकतींना करपात्र रक्कम ठरवितांना १५% ऐवजी १०% सुट देण्यात यावी.

**नगरसचिव कार्यालय,**
**पुणे महानगरपालिका,**
शिवाजीनगर, पुणे ४११००५.
दिनांक :–११/२/२०१९.

**सुनील पारखी,**
**नगरसचिव,**
पुणे महानगरपालिका.

**(टीप :– प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची कागदपत्रे (डॉकेटस्) मा. नगरसचिव यांच्या कार्यालयात वाचण्यासाठी ठेवली आहेत.)**